# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०७/०२/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :- अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा फेटरी बस स्टॉप जवळ येथे ०५/०२/२०२२ चे १९.०० वा. ते दि ०७/०२/२०२२ चे ०७.३० वा. पर्यंत फिर्यादी नामे- राजेश दामोधर गुबे, वय ४४ वर्ष, रा. गणापती नगर झिंगाबाई टाकळी, नागपुर यांचे मोटार रिवाईडीग दुरूस्तीचे दुकान रविवारी बंद असल्याने अज्ञात आरोपीने त्यांचे दुकानाचे लाकडी दरवाजाचे कुलुप तोडुन दरवाजा उघडुन दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानामधील १) ०३ मोटारीचे भटेटर (तांब्याचे ताराचे) अंदाजे ०९ किलो कि. ४,५००/-रू., २) मोटारीचे दुरूस्ती करिता आलेले मोटारीचे केबल अंदाजे ३० मिटर एकुण १,२००/-रू., ३) नविन तांब्याचे बंडल चक्रीमध्ये बुंडालेला तांबा तार अंदाजे १५ किलो एकुण ७,५००/-रू. असा एकुण कि. १३,२००/-रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

### अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. जलालखेडा** :- अंतर्गत काटोल ते वरूड बाबा गरीब नवाज यांचा बिल्डींग जवळ, मेन रोड जलालखेडा येथे दिनांक ०५/०१/२०२२ चे २१:०० ते २२:३० वा. दरम्यान मृतक/आरोपी नामे- सुरजसिंग राजेंद्रसिंग ठाकुर, वय ३१ वर्ष, रा.पुलगाव हनुमान नगर जि.वर्धा याने त्याच्या ताब्यातील एम.एच. -३२/एजे-०१८३ क्रमांकाच्या मोटरसायकलने त्याचा मित्रासह नागपुर वरून जलालखेडा मार्ग बेलोना येथे जात होता. त्यादरम्यान त्याने त्याचे मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असतांना अचानक ब्रेक दाबल्याने मोटरसायकल स्लिप होवुन रस्त्यावर पडल्याने त्याच्या डोक्याला मार लागला. त्यास उपचारकामी प्रथम पीएचसी जलालखेडा व नंतर प्रायव्हेट हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मेडीकल कॉलेज नागपुर येथे मरण पावला.

. सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक दिनेश जोगेकर पो.स्टे.जलालखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री शेंडे मो.नं.९६३७५७८७६३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत १८ कि. मी. अंतरावरील मौजा बेसुर शिवार उमरेड ते गिरड रोड येथे दिनांक ०६/०२/२०२२ चे १६:३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुधीर गुलाबराव भुजाडे वय ५४ वर्ष रा. न्यु अडयाळवाले ले–आउट उमरेड व त्यांची पत्नी व सासरे हे मौजा सावंगी (झाडे) ता. समुद्रपूर, जि. वर्धा येथुन येत असतांना मौजा बेसुर शिवारात एमएच– ४०/एन– ५९३६ क्रमांकाचा ट्रक चा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगाने चालवून फिर्यादीची एमएच– ४०/ई– ८३४४ क्रमांकाची मोटरसायकला होन्डा सीडी डॉनला समोरून धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे सासरे गोविंदा शामराव जीसातारकर यांचे मरणास कारणीभूत होवून तसेच फिर्यादी व त्याचे पत्नीस जखमी करून घटनास्थळावरून पळून गेला.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवि सहकलम १३४,१७७,१८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री प्रशांत खोब्रागडे मो क्र. ८८८८८१७१८३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**